Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-6(A) June-2026

Original Article

# मुख्यमंत्री कार्यकाळातील सुधाकरराव नाईक यांचे प्रशासकीय व राजकीय कार्य

**योगेश मधुकर चव्हाण[1], प्रा. डॉ. विपिन एम. राठोड[2]**
[1]संशोधक, राजस्थान आर्यन कला महाविद्यालय, वाशीम
[2]मार्गदर्शक, राजस्थान आर्यन कला महाविद्यालय, वाशीम
**Email:** chavhanyogesh428@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180611
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 6(A)
Pp 40-45
June - 2026
**Submitted:** 10 May 2026
**Revised:** 20 May 2026
**Accepted:** 10 June 2026
**Published:** 30 June 2026

***सारांश***

*"मुख्यमंत्री कार्यकाळातील सुधाकरराव नाईक यांचे प्रशासकीय व राजकीय कार्य" या संशोधन लेखात सुधाकरराव नाईक यांच्या १९९१ ते १९९३ या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातील महत्त्वपूर्ण प्रशासकीय व राजकीय निर्णयांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यांनी शेतकरी, ग्रामीण विकास, जलसंधारण, स्थानिक स्वराज्य संस्था, कायदा व सुव्यवस्था, आदिवासी विकास आणि सार्वजनिक आरोग्य या क्षेत्रांत दूरदृष्टीने निर्णय घेतले. स्वतंत्र जलसंधारण खात्याची स्थापना, शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याजदरात कपात, मुंबईतील गुंडगिरीविरोधातील कठोर कारवाई, जिल्हा परिषद अध्यक्षांना राज्यमंत्री दर्जा, मेळघाट नवसंजीवनी योजना तसेच गॅस्ट्रो साथीवर प्रभावी नियंत्रण ही त्यांच्या कार्यकाळातील उल्लेखनीय कामगिरी ठरली. त्यांच्या निर्णयक्षम, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण बदल घडून आले.*

***मुख्यशब्द:*** *सुधाकरराव नाईक, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, प्रशासकीय कार्य, राजकीय नेतृत्व, जलसंधारण, शेतकरी कल्याण, स्थानिक स्वराज्य संस्था, आदिवासी विकास, कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य*

## प्रस्तावना :-

सुधाकरराव नाईक हे महाराष्ट्राचे एक ऐतिहासिक निर्णय घेणारे मुख्यमंत्री होते. त्यांच्या कार्यकाळात म्हणजेच १९९१ ते १९९३ पर्यंत जनतेच्या हिताचे महत्वाचे निर्णय घेण्यात आले. सुधाकरराव नाईक यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना केल्या होते कि, जनतेचे कोणतेच काम शासकीय कार्यामुळे अडले नाही पाहिजे. त्यांचा जन्मच शेतकरी कुटुंबात झाले असल्यामुळे शेतकऱ्यांना कोणकोणत्या अडचणीचा सामना करावा लागतो यासंबंधी स्पष्ट जाण त्यांना होती. शेतकऱ्यांची संपूर्ण शेतीच निसर्गावर अवलंबून असते. त्यामुळे शेतकऱ्यांना अस्मानी संकटासोबत सुलतानी संकटांना तोंड न द्यावा लागावा यासाठी शासन स्तरावर त्यांना कोणत्याच अडचणी येऊ नये यासाठी ते सतत जागरूक होते. सुधाकरराव नाईक यांचे काका माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक याचं पण शेतकऱ्या बद्दल फार कळवला होता. आभाळातून पाणी पडले कि त्यांना खूप आनंद होत होते. त्यामुळे त्यांनी मुख्यमंत्री निवासाच नाव 'वर्षा' ठेवले होते. आजही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री निवासाचे नाव वर्षाच आहे. अगदी त्याचप्रमाणे सुधाकरराव नाईकांना पण शेतकऱ्याचा कळवला होता. ते शेतकऱ्यासंबधि कोणतेही निर्णय घेतांना त्यात शेतकऱ्याचा किती फायदा आहे याचा विचार करत असे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*योगेश मधुकर चव्हाण संशोधक, राजस्थान आर्यन कला महाविद्यालय, वाशीम*

**How to cite this article:**
*चव्हाण, योगेश. मधुकर. & राठोड, विपिन. एम. (2026). मुख्यमंत्री कार्यकाळातील सुधाकरराव नाईक यांचे प्रशासकीय व राजकीय कार्य. Journal of Research & Development, 18(6(A)), 40–45. https://doi.org/10.5281/zenodo.21490166*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21490166
OPEN ACCESS

**सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असतांना खालीलप्रमाणे कार्य त्यांनी केलेले आहे.**

**१. महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार बहुमतात आणले :-**

सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री पदाची जेव्हा शपथ घेतली तेव्हा त्यांचे सरकार अल्पमतात होते. त्यांना १० आमदार बहुमतासाठी कमी पडत होते. त्यांच्या आधीच्या मुख्यमंत्र्यांनी राज्याचे सरकार अल्पमतात असतांना सरकार चालविले होते. परंतु सुधाकरराव नाईकांनी जनता पक्षातील ९ आमदार पक्षांतर करून काँग्रेस मध्ये बसविले, अल्पमताचे सरकार बहुमतात कसे आणले हे कोणाला कळू पण दिले नाही. त्यांनी अशी अशक्यप्राय गोष्ट कशी केली असा प्रश्न त्यांना पत्रकारांनी विचारला. त्यावर त्यांनी मिश्किल उत्तर दिले कि, "शिकार टप्यात आल्याशिवाय मी शिकार करीत नाही". आधी मी शिकारीवर नेम बरोबर बसेल याची वाट पाहतो आणि नंतरच बार करतो असा सणसणीत उत्तर त्यांनी दिले. त्यांच्या मुख्यमंत्री पदावर बसल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या विरोधी पक्षाला दिलेला हा राजकारणातील त्यांचा दुसरा झटका होता.

**२. स्वतंत्र जलसंधारण खात्याची निर्मिती :-**

सुधाकरराव नाईकांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळातील महाराष्ट्राच्या राजकारणातील ऐतिहासिक ठरणारा आणखी महत्वाचा निर्णय म्हणजे त्यांनी केलेल्या स्वतंत्र जलसंधारण खात्याची निर्मिती होय. त्यांना हा निर्णय याच्यासाठी घ्यावा लागला कारण महाराष्ट्रातील शेती हि मोठ्या प्रमाणात कोरडवाहू होती. त्या शेतजमिनीला पाण्याची कमतरता होती. महाराष्ट्रातील शेतकरी हे पावसाच्या पाण्यावर शेती करतात. हे शेतकरी पावसाच्या कमतरतेमुळे पाण्याचे योग्य नियोजन करू शकत नाही. कोणत्या महिन्यात किती पाऊस पडतो यानुसार ते पिकाचे नियोजन करतात. सुधाकरराव नाईकांना पाण्याचे नियोजन करण्याचे कौशल्य जन्मजात होते. ते आपले जन्मगाव गहुलीचे सरपंच होते तेव्हा त्यांनी गावात पाण्याचे नियोजन केले होते. त्यांनी राज्यात पाण्यासंबधी योग्य निर्णय घेता यावा, राज्यात जलसंधारण करता यावा यासाठी स्वतंत्र अशा जलसंधारण खात्याची निर्मिती केली. या जलसंधारण खात्याच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रातील पाण्याचे चांगले नियोजन केले. अगदी नागरिकांचे हित पाहून यामध्ये निर्णय घेतले. जलसंधारण खात्यात असे ठरले कि पाणी विहिरीत साठले पाहिजे यासाठी जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरले पाहिजे ते मुरलेले पाणी नंतर विहिरीला लागेल. या खात्याला शेतकऱ्यांसाठी जास्तीत जास्त पाणी उपलब्ध करून देणे निकराचे होते. विहिरीच्या पाण्याच्या माध्यमातून शेती हि सिचीत बनली पाहिजे. असे शेतकऱ्यांसाठी गरजेचे काम त्यांनी केले. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात जलसंधारण तलाव, पाझर तलाव, शेततळी मोठ्या प्रमाणात निर्माण करावयाची केली.. जास्तीत जास्त शेततळी निर्माण करून शेती सिंचित करण्यात आली. त्यासाठी त्यांनी वनजमिनीचा ताबा घ्यायला सुरुवात केली आणि त्या वनजमिनीवर तलाव बांधण्याचे निश्चित करण्यात आले. जास्तीत जास्त वनजमिनीवर तलाव बांधण्यात आले. त्यांनी बांधलेले तलाव आजही इतिहासाची साक्ष देत उभे आहे. हे तलाव वनजमिनीवर खोदले असल्यामुळे शेत जमिनीचा फायदा झाला. कारण हे तलाव वनजमिनीवर असल्यामुळे त्या तलावातून शेतीला पाणी मिळायला लागले.

**३. मुंबईतील गुंडगिरी हद्दपार केली :-**

सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असतांना आणखी एक महत्वाचा निर्णय घेतला होता ते म्हणजे त्यांनी महाराष्ट्रामधून गुंडगिरीला हद्दपार केली. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री होते त्या काळात संपूर्ण महाराष्ट्रभर गुंडगिरीने हौदोस घातला होता. गुंडगिरीला हद्दपार करण्याच्या निर्णयाने ते महाराष्ट्रातील जनतेच्या आजही स्मरणात राहिलेले आहे. त्यांनी या गुन्हेगारांचा पर्दाफाश केला. सुधाकरराव नाईकांना असे आढळले कि, या गुन्हेगारांचा राजकारणी लोकांशी मधुर संबंध आहे. गुंडाचा राजकारणी लोकांशी मधुर संबंध होता म्हणूनच ते गुंड शिरजोर झाले होते. त्या गुन्हेगरामार्फत दररोज महिलांच्या गळयातील हिसकावून जात होते. त्यांना पोलीस किवा प्रशासनाची भीती नव्हती. सामान्य, मध्यमवर्गीय माणसावर गुंडाकरवी जे अन्याय, अत्याचार होत होते त्यामुळे गुंड आणि गुन्हेगार

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-6(A) June-2026

यांची हिम्मत खूप वाढली होती. म्हणजेच गुंड शिरजोर झाले होते. त्यांच्या कडून खंडणी मागण्याने, अपहरण घटनांनी व्यापारी वर्ग त्रस्त झाला होता. याच सगळयात महत्वाच कारण म्हणजे गुंड आणि राजकारणी याचं मधुर सबंध होते. ती अत्यंत चिंतनीय बाब होती. ज्या राजकारणी लोकांचा गुंडाशी सहसंबध होता त्यात पप्पू कलानी आघाडीवर होते. हे पप्पू कलानी काँग्रेस चे आमदार होते. पप्पू कलानी नावाचा आमदार सुधाकररावाच्या मंत्रिमंडळात होता. पप्पू कलानीचे ठाण्यात सीमा रिसॉर्ट म्हणून एक हॉटेल होते. त्या रिसॉर्टमध्ये अनेक उद्योगपती, चित्रपटनिर्माता, श्रीमंत लोक व राजकारणी रात्री १० वाजेच्या नंतर एकत्र जमत होते. त्या रात्रीमध्ये अनेक बेकायदेशीर कृत्य होत होते. हे कृत्य सुधाकरराव नाईकांना खपणारे नव्हते. त्यांच्या डोक्यात सतत हे प्रकरण निपटून काढण्याचा विचार सुरु होता. त्यांच्या काळात मधुकर पाटील नावाचे कलेक्टर ठाण्यात आले होते. त्यांनी पण प्रशासकीय कामात ठोस निर्णय घेण्याचा दबदबा निर्माण केला होता. सुधाकर नाईकांना कळले कि पप्पू कलानीचा बंदोबस्त मधुकर पाटील करू शकतात. त्यावेळी सुधाकररावांनी मधुकर पाटीलांना या कामाचा निपटारा करण्याचे काम दिले. त्यांना या कामात कोणताच शासकीय दबाव येणार नाही याची ग्वाही दिली. त्यांनी प्रथमतः हे रिसॉर्ट बेकायदेशीर बांधलेले नाही याचा पुरावा मागितला. याचा पुरावा पप्पू कलानी सादर करू शकले नाही.म्हणून  सीमा रिसॉर्टवर बुलडोजर चालविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यावेळेस एका केंद्रीय मंत्र्याचा फोन त्यांना आला की, बुलडोझर चालवून तो रिसॉर्ट जमीनदोस्त करण्यापेक्षा ती इमारत शासकीय कामासाठी वापरा पाहिजे. पण त्यावेळी सुधाकररावांनी कोणाचेही एकले नाही. एका रात्रीत सीमा रिसॉर्टवर बुलडोझर  चालवून जमीनदोस्त करून टाकला. त्यांनी केलेल्या कामाच कौतुक अनेक वृत्तपत्रातून दुसऱ्या दिवशी छापून आले. त्यावेळी राज्याचा मुख्यमंत्री म्हणून नाईकांनी पुरेपूर या पदाचा उपयोग करून घेतला. या बेकायदेशीर बांधलेल्या ७ कोटीची भव्य इमारत त्यांनी  पूर्ण कायदेशीर पद्धतीने व आगाऊ सूचना देऊन जमीनदोस्त केली. या त्यांच्या निर्णयाने देशभर खळबळ माजली. त्यावेळी सर्व वृत्तपत्रांनी त्यांच्या निर्णयाचे कौतुक केले. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री म्हणून गुंडगिरीचा आणि गुन्हेगारांचा त्यांनी पर्दाफाश केला. महाराष्ट्रातील जनता सुखावून गेली होती होण्याच्या अगोदर गुंडगिरीला खतपाणी भेटत होते. गुंडगिरीला हद्दपार केल्याच्या निर्णयाने ते महाराष्ट्रातील जनतेच्या आजही  स्मरणात राहिलेले आहे.

**४. जिल्हापरिषद अध्यक्षांना राज्य मंत्रीपदाचा दर्जा दिला :-**

अध्यक्षांना राज्यमंत्री पदाचा दर्जा दिला. सुधाकरराव नाईक स्वतः यवतमाळ जिल्हा परिषदेचे १९७२ ते १९७७ या काळात अध्यक्ष होते. ते सतत पाच वर्ष जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. जिल्हा परिषद अध्यक्ष असतांना त्यांनी अनेक जनकल्याणकारी योजना जनतेसाठी राबविल्या. महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्था निर्माण करण्याचे श्रेय माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना जाते. त्यांनीच त्रिस्थरीय पंचायतराज व्यवस्थेची रचना केली होती. ती रचना त्यांनी केंद्र शासनाला सादर केली आणि केंद्र शासनाने हि त्रिस्तरीय रचना महाराष्ट्रात जसेच्या तसे लागू करण्याचा निर्णय घेतला. या त्रिस्तरीय रचनेनुसार यवतमाळ जिल्हा परिषद स्थापन झाले होते. यवतमाळ जिल्हा परिषद स्थापन झाल्यानंतर सुधाकरराव स्वतः जिल्हा परिषद अध्यक्ष झाले. त्यांना जिल्हा परिषद अध्यक्षाकडे कोणती कार्य असतात, कोणकोणत्या योजना परिसरात राबवाव्या लागतात, लोकांची अध्यक्षाकडून काय अपेक्षा असतात  ते जवळून पहिले होते. जि.प. अध्यक्षांना निर्णय घेतांना मोठ्या विरोधाचा सामना करावा लागतो. निर्णय घेतांना सर्व तालुक्याचा समन्वय ठेवावा लागतो. निधी वाटप करतांना प्रत्येक तालुक्यात सम समान निधी वाटावा लागतो. त्यांना अनेक धाडसी निर्णय घ्यावा लागतो, निर्णय घेतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांचा निर्णय  पण विचारात घ्यावा लागतो. एवढ्या लोकांशी अध्यक्षाला समन्वय साधावा लागतो म्हणून  या पदाला महत्व प्राप्त व्हावा यासाठी त्यांनी जि.प. अध्यक्षाला राज्यमंत्री करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी जि.प. अध्यक्षांना लाल दिव्याची गाडी दिली. कारण लोकांना त्या पदाचा महत्व कळले पाहिजे आणि या पदाचा लोकांनी आदर ठेवला पाहिजे व प्रशासनात त्या पदाचा दबदबा राहिला पाहिजे. जेव्हा अध्यक्षांना राज्यमंत्री पदाचा दर्जा मिळाला तेव्हा त्या पदाला वजन प्राप्त झाले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-6(A) June-2026

**५. स्थानिक स्वराज्य संस्थेत कॉंग्रेस पक्षाची सत्ता आणली.**

श्री सुधाकरराव नाईक महाराष्ट्र राज्याचे विविध खात्याचे मंत्री असतांना जनतेच्या हिताचे निर्णय घेतलेले आहे. ते मुख्यमंत्री पदी बसल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील सगळया जिल्हा परिषदामध्ये कॉंग्रेस पक्षाला बहुमतात आणले. अशी किमया त्यांच्याआधी कोणत्याच मुख्यमंत्र्याला करता आली नव्हती. अगदी नावाजलेले मुख्यमंत्री शरद पवारांना देखील नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्रातील सगळया स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका एका टप्प्यात घेण्याचे त्यांनी ठरविले. त्यांचा हा निर्णय कॉंग्रेस पक्षाला हाणीकारक ठरू शकतो असा अंदाज बऱ्याच राजकीय तज्ञांनी व्यक्त केला. पण तज्ञाच्या म्हणण्यावर ते म्हणायचे कि, मी ज्या समुदायात जन्माला आलो तो समुदाय जंगलात राहणारा आहे. त्या समुदायांनी असंख्य जंगली श्वापदाशी सामना केलेले असल्यामुळे त्यांना कशाचीही भीती वाटत नव्हती. त्यामुळे एकत्र निवडणूक लढायला मला कसलीच भीती नाही. आणि झाले तसेच सगळया निवडणुका सोबत लढण्याचा निर्णय घेऊन सगळया स्थानिक स्वराज्य संस्थेत कॉंग्रेस पक्षाची सत्ता एकहाती मिळवून दिली.

**६. शेतकऱ्यांचे व्याजदर कमी केले :-**

श्री सुधाकरराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याच्या आधी महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या कर्जावर १० टक्के व्याज होते. १० टक्के व्याजदर शेतकऱ्यासाठी जास्त होते. कारण शेतकरी एवढी मेहनत घेऊन पिक काढतो. पण ते पिक नैसर्गिक कारणामुळे घरात येईल याची हमी नसते. महाराष्ट्रातले व्यापारी व्यापार करून अमाप पैसा कमवतात आणि त्यांनी घेतलेल्या पेशावरचा व्याज कमी असतो जर व्यापाराकडून जास्त व्याज घेतला तर त्यांना काही फरक नसता. पण रक्ताच पाणी करणारा शेतकरी राबराब राबून पिक पिकवतो त्यांना एवढा व्याजदर त्यांच्यावर अन्याय करणारा होता. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री झाल्याबरोबर त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी १० टक्के असणारा व्याजदर ६ टक्यावर आणले. त्यांच्याआधी महाराष्ट्रातील कोणत्याच मुख्यमंत्र्यांनी असा निर्णय घेतला नव्हता. त्यांचा हा निर्णय महाराष्ट्राच्या राजकारणात क्रांतिकारक ठरला.

**७. जहाल नक्षलवादीला ठार करणाऱ्या अधिकाऱ्याचा सत्कार :-**

सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असतांना आणखी एक एतीकासिक निर्णय घेतला. तो निर्णय म्हणजे जहाल नक्षलवादी विजयकुमारला ठार मारणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचा सत्कार त्यांनी मुख्यमंत्री असतांना घेतला. यावेळी संपूर्ण देशात गाजत असलेल्या नक्षलवाद व दहशतवाद या चळवळीला तोंड देत असतांना महाराष्ट्रातील मराठवाड्यात हौदोस घालणाऱ्या विजयकुमार या दहशदवाद्याला ठार मारणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचा जाहीर बक्षीस देण्याचा समारंभ आयोजित करून त्यांचा सत्कार करण्यात आले. त्यांचे मनोधेर्य, प्रेरणा, व काम करण्याची जिद्द वाढावी या अपेक्षेने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. सांगायचा उद्देश म्हणजे सुधाकरराव नाईक कोणत्याच गोष्टीला भीत नसे. नाहीतर दुसऱ्या मुख्यमंत्र्यांनी नक्षलवाद्याना ठार मारणाऱ्या अधिकाऱ्याचा सत्कारच केला नसता. पण सुधाकर नाईक यांना कधी पदाचा लालस नव्हता. म्हणून त्या अधिकाऱ्यांचा सत्कार करायला ते भिले नाही. उलट त्यांच्या सत्कारामधून त्या अधिकाऱ्यांना प्रेरणा मिळाली. हा घटनेमधून त्या अधिकाऱ्यांनाच प्रेरणा मिळाली नाही तर जे अधिकारी आपल्या ड्युटीत प्रामाणिक होते अशांना पण प्रेरणा मिळाली.

**८. मेळघाट नवसंजीवनी योजना राबविली :-**

मेळघाट हे क्षेत्र अमरावती जिल्ह्यामध्ये आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणत आदिवासी लोकांची वस्ती होती. मेळघाट या आदिवासी क्षेत्रामध्ये कोरकू जमातीचे लोक राहत होते. मेळघाट नवसंजीवनी योजनेला सुधाकरराव नाईक यांनीच आकार दिला. सुधाकरराव नाईकांचे पूर्वज जसे जंगलात राहणारे होते तसेच आदिवासी लोक पण जंगलात राहणारे होते. हे लोक शिक्षणात अडाणी असल्यामुळे त्यांच्यामध्ये अंधश्रद्धा चे प्रमाण मोठ्या प्रमाणात होते. हे आदिवासी आधुनिक जीवनाशी परिचित नव्हते. मुला-मुलीचे कमी वयामध्ये विवाह करण्याची पद्धत त्यांच्यामध्ये आजही प्रचलित आहे. आजही या समाजातील लोक निसर्गावर जास्त विश्वास ठेवतात. हे

लोक आधुनिक वैद्यकीय उपचारावर आजही विश्वास ठेवत नाही. आजही मेळघाट परिसरात रहदारीच्या सुविधा नाही आहे. त्यामुळे त्यांच्यापर्यंत सरकारी सुविधा पोहोचत नाही. परिणामी आदिवासी समाज दिवसेंदिवस मागासलेला असतो. या समाजाला आधुनिक जीवनपद्धतीत सामावून घ्यायचं असेल तर या समाजाकडे जातीन लक्ष दिले पाहिजे. महाराष्ट्र सरकारने त्यांच्यासाठी योजना आखली पाहिजे. नुसती योजना आखली नाही पाहिजे तर ती योजना त्यांच्यापर्यंत पोहोचली पाहिजे. म्हणून त्यांनी महाराष्ट्रामध्ये आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केली होती. सुधाकर नाईक या महामंडळातर्फे मेळघाट क्षेत्राचा चेहरा मोहरा बदलू पाहत होते. सर्वप्रथम त्यांनी या महामंडळावर योग्य मंत्र्याची निवड केली. सुधाकर नाईकांनी या क्षेत्रासाठी अनेक योजना प्रत्यक्षात आणल्या. या क्षेत्राचा त्यांनी अधिक विकास केला आणि हा विकास मेळघाट नवसंजीवनी योजना आणून केला.सुधाकरराव नाईक यांचा मुख्यमंत्री पदावर असतांना एक धाडसी निर्णय म्हणजे त्यांनी जिल्हा परिषद

**९. गॅस्ट्रोची साथीवर मात :-**

सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असतांना धडाडीचा निर्णय घेण्यात त्यांचा दबदबा होता. त्यांनी अनेक संकटांचा सामना करत त्यांनी मुख्यमंत्री पद सांभाळले. त्यांच्या काळात ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील मोरवाड येथे दरवर्षी उन्हाळ्यात गॅस्ट्रोची साथ येत होती. यावेळी मोठी माणसे, लहान मुले फार मोठ्या संख्येने मृत्युमुखी पडत होती. हि गॅस्ट्रोची साथ दुषित पाण्यामुळे येत होती. कारण आदिवासी लोक पारंपारिक खान पानाचा अवलंब करत असल्यामुळे त्यांच्या पिण्यात दुषित पाणी येत होता. त्या दुषित पाण्यामुळे लोकांना गॅस्ट्रोची लागण झाली होती. या साथीच्या रोगाच निवारण करण्यासाठी सुधाकरराव नाईकांनी सर्व शासकीय यंत्रणा व कार्यकर्ते यांना कामासाठी लावले होते. आरोग्य कर्मचाऱ्यांना त्यांनी या रोग निवारणासाठी पाहिजे असलेली मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी कर्मचाऱ्यांना हा रोग आटोक्यात येईल असे काम करा असे आदेश दिले. हे रोग लवकर आटोक्यात यायला पाहिजे त्यासाठी सर्व औषध उपचार आदिवासी लोकावर करा असा फर्मान काढला होता. हे आदिवासी लोक आधुनिक औषध उपचारावर विश्वास ठेवत नाही. ते लोक या उपचार पद्धतीवर विश्वास ठेवायला पाहिजे असा त्यांच्यावर उपचार करा. या समाजातील अंधश्रद्धा कमी व्हायला पाहिजे अशी उपाययोजना करा असा निर्देश त्यांनी सरकारी कर्मचाऱ्यांना दिला. अनेक वेळी त्यांनी स्वतः प्रत्यक्ष भेटी दिलेली होती. नुसती भेट नाही तर औषधि वाहनाची तडकाफडकी व्यवस्था सुद्धा त्यांनी केली होती. या भेटीमध्ये त्यांनी आरोग्य विभाग किती तत्पर आहे याची शहानिशा केली. प्रत्यक्ष आदिवासी पाड्यावर त्यांनी भेटी दिली या भेटीसाठी कुठलाही सरकारी लवाजमा त्यांनी केला नाही. ते आदिवासी लोकांची भेट घेतांना अगदी साधी भेट ते घेत असत. ते म्हणत असत कि आदिवासी लोकामध्ये आपण साध्या पद्धतीने पाड्यावर गेलो तर ते लोक त्यांच्यावर विश्वास ठेवतात त्याचं सल्ला एकूण घेतात. सांगायचा उद्देश म्हणजे सुधाकर नाईकांनी हे प्रकरण अत्यंत साध्या पद्धतीने हाताळले. स्वस्तधान्य दुकानातून आदिवासींना धान्य मिळते कि नाही यावर जातीने लक्ष दिले. कारण हि समस्या आदिवासी पाड्यावर आली तेव्हा अनेक आदिवासी यात मरण पावले. या मरणाच आणखी एक कारण म्हणजे या आदिवासी लोकांना खायला सकस अन्न न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये रोग प्रतिकार क्षमता कमी होती. त्यानुळे या आदिवासी लोकांना भरपूर अन्न स्वस्तधान्य दुकानातून मिळायला पाहिजे असा आदेश त्यांनी काढला. या परिसरातील स्वस्तधान्य दुकानातून सकस आहाराचा पुरवठा त्यांनी केला. अशाप्रकारे त्यांनी गॅस्ट्रोच्या साथीवर त्यांनी विजय मिळविला.

**निष्कर्ष :-**

१. सुधाकरराव नाईक यांनी अथक प्रयत्नाने महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात सुधारणा केली.

२. सुधाकरराव नाईक यांच्यामुळे पुसद परिसरात शिक्षणाची गंगा आली.

३. सुधाकरराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक निर्णय घेऊन शिक्षणाची दिशा अचूक केली.

४. सुधाकरराव नाईक यांनी महाराष्ट्रातील गरीब मुलासाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-6(A) June-2026

५. सुधाकरराव नाईक यांनी विदर्भातील मुलीसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

**संदर्भ :-**

१. बेलोलकर के.जी, 'सुधास्मृती' दिव्या प्रकाशन, २००२, पुसद. पृ. क्र. ३५.

२.. जयश्री संतोष तेली, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, बुकप्सेस पब्लिकेशन, २०१६, पुणे पृ. क्र. ७०२.

३. पु. धुमाळे, व डॉ. रुद्रवार, महाराष्ट्राचे वसंत वैभव, हिराणी प्रकाशन पुसद, २०००.